आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८ मे २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सीबीएसईच्या बारावीच्या परीक्षेच्या मूल्यमापन प्रक्रियेतल्या त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न
- कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांचा राजीनामा, डी. के. शिवकुमार यांची मुख्यमंत्रीपदासाठी शिफारस
- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित यानिक सिनर दुसऱ्याच फेरीत पराभूत

**आणि**

- प्रसिद्ध शायर बशीर बद्र यांचं निधन

**<><><><><>**

सीबीएसईच्या बारावीच्या परीक्षेच्या मूल्यमापन प्रक्रियेतल्या त्रुटींची केंद्र सरकारनं दखल घेतली आहे. त्या दूर करण्यासाठी योग्य कारवाई केली जाईल, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत सीबीएसईच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलत होते. सर्व विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन केलं जाईल, असं प्रधान यावेळी म्हणाले…

**होल्ड.. बाईट - धर्मेंद्र प्रधान**

**<><><><><>**

राज्यात इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठीची पहिली यादी उद्या सकाळी ११ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातल्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेशासाठी राज्यभरातून १२ लाख ५१ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधी अभ्यासक्रमात व्यापक सुधारणा करण्याच्या उद्देशाने आज इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत एआय अभ्यासक्रम कृतीदलाबरोबर उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधलं सहकार्य अधिक दृढ करणं आणि एआय संबंधी शिक्षणाला भविष्यातल्या तांत्रिक गरजांशी जुळवून घेणं यावर चर्चा झाली.

**<><><><><>**

तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकून भारत सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश ठरल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत खरीप अभियान 2026 या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करत होते. देशातल्या कष्टाळू शेतकऱ्यांच्या प्रयत्नांमुळेच देशात अन्नसाठ्याची कोणतीही कमतरता नाही. यंदा देशातलं अन्नधान्याचं अंदाजित उत्पादन ३७ कोटी ६० लाख टनांपेक्षा जास्त असून हा आकडा गेल्यावर्षीच्या तुलनेत ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी जास्त असल्याचं चौहान यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. आपल्या सरकारकडे पूर्ण बहुमत असून मुख्यमंत्रिपदासाठी डी के शिवकुमार यांना शपथ घेण्यासाठी आमंत्रित करावं अशी विनंती त्यांनी राजीनामापत्रात राज्यपालांना केली आहे.

सिद्दरामय्या हे सर्वाधिक काळ कर्नाटकचे मुख्यमंत्री राहिले आहेत. ते याआधी २०१३ ते २०१८ या काळात कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळाल्यानंतर ते दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. पक्षानं आपल्याला राज्यसभेची जागा देऊ केली होती, मात्र त्याला नम्रपणे

नकार दिल्याचं सिद्धरामय्या यांनी सांगितलं. राष्ट्रीय राजकारणात आपल्याला रस नसून राज्यातल्या जनतेसाठीच आपण काम करत राहू, असं ते म्हणाले.
मुख्यमंत्रिपदासाठी नामनिर्देशित डी के शिवकुमार हे कर्नाटक काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या विजयात त्यांची भूमिका महत्वाची होती.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्यातल्या अनेक प्रश्नांवर त्यांनी प्रधानमंत्र्यांशी चर्चा केली, तसंच राज्यातल्या अनेक प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीची माहिती प्रधानमंत्र्यांना दिली.

**<><><><><>**

महायुतीत आरपीआयला कमी महत्व दिलं जात असल्याची खंत पक्षाचे अध्यक्ष, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. आज यवतमाळमधे बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं, की शिवसेना-भाजपा युती असताना ज्यावेळी आरपीआय युतीत आला तेव्हा शिवशक्ती भीमशक्ती झाली, मात्र आता एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा पक्ष मिळून महायुती झाल्यानं रिपाईचं महत्व कमी झालं आहे, रिपाइला सत्तेत सहभाग मिळत नाही, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. एखादा मंत्री रिपाईचा असायला हवा, त्यादृष्टीनं विधान परिषदेची एक जागा अपेक्षित आहे, असं आठवले म्हणाले..

**होल्ड - बाईट - आठवले**

**<><><><><>**

तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांचं संसदेतलं वर्तन महिलांप्रति अपमानास्पद असल्याची तक्रार तृणमूलच्याच खासदार काकोली घोष दस्तिदार यांनी केली आहे. बॅनर्जी यांचा महिलांविषयीचा दृष्टिकोन दूषित असून त्यांना शिक्षा

करावी अशी मागणी काकोली यांनी लोकसभेचे सभापती ओम बिरला यांना पत्र लिहून केली आहे.

<><><><><>

गडचिरोली तसंच छत्तीसगड पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई करत आज गडचिरोली आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती जंगलात नक्षलवाद्यांनी सुरु केलेला शस्त्र निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केला. यावेळी पोलिसांनी अनेक बंदुका, स्फोटकं आणि ते तयार करण्याचं साहित्य ताब्यात घेतलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी चौकशीदरम्यान या कारखान्याबद्दल माहिती दिली होती.
गेल्या आठवड्यात भामरागड तालुक्यातल्या बिनागुंडा जवळच्या जंगलातला असाच एक शस्त्रनिर्मितीचा कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला होता.

<><><><><>

कुस्तीपटू विनेश फोगट हिला यंदाच्या आशियाई खेळांसाठीच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला भारतीय कुस्ती महासंघाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. मातृत्वाच्या रजेनंतर पुनरागमन करणाऱ्या विनेशला महासंघाने निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्यासाठी नकार दिल्याने तिने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मातृत्वाला कोणत्याही प्रकारे व्यावसायिक अडथळा किंवा एखाद्या खेळाडूला प्रतिकूल वागणूक देण्याचं कारण मानले जाऊ शकत नाही, असं न्यायालयाने स्पष्ट करून विनेश हिला निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली होती.

<><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत अग्रमानांकित यानिक सिनर याला दुसऱ्या फेरीत पराभवाचा धक्का बसला. अर्जेंटिनाच्या हुआन मॅन्युएल सेरुंदोलो याची सिनरवर ३-६, २-६, ७-५, ६-१, ६-१ अशी मात केली. पहिले दोन सेट्स हरल्यानंतरही दमदार पुनरागमन करत सेरुंदोलो यानं सामना जिंकला.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला दुहेरीच्या सामन्यातून व्हिनस विल्यम्स आणि हेली बॅप्टिस्ट यांनी कोणतंही कारण न देता माघार घेतली आहे. आज त्यांनी याची घोषणा केली. त्यामुळे या जोडीच्या जागेवर अमेरिकेची यूडिस चोंग  आणि वेरोनिका रेजवेक ही जोडी खेळणार आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध शायर बशीर बद्र यांचं आज भोपाळ इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. उर्दू भाषेत त्यांनी लिहीलेली शेरोशायरी देश कालाची बंधनं पार करुन प्रसिद्ध झाली होती. ‘आस’, ‘कुलियते बशीर बद्र’, ‘आमद’, ‘आहट’ आणि देवनागरी लिपीत लिहीलेल्या उर्दू गजलांचा संग्रह ‘उजाले अपनी यादों के’, ही त्यांची पुस्तकं गाजली.

“*दुष्मनी जमकर करो, लेकिन गुंजाईश रहे, जब कभी हम दोस्त हो जायें तो शर्मिंदा न हो*” हा भारत पाकिस्तान सिमला कराराच्या वेळी त्यांनी लिहीलेला शेर सर्वतोमुखी झाला होता. अयोध्येत जन्मलेले बशीर बद्र यांनी लहान वयात कविता लिहायला सुरुवात केली. मेरठमधलं त्यांचं घर आणि त्यातलं अप्रकाशित साहित्य जातीय दंगलीत जाळलं गेल्यावर भोपाळमधे त्यांनी आयुष्य नव्यानं सुरु केलं होतं. उर्दू भाषेचं अध्यापनही त्यांनी केलं. १९९९ मधे त्यांना पद्मश्री सन्मान मिळाला. तसंच साहित्य अकादमी आणि इतर प्रतिष्ठेचे पुरस्कारही मिळाले होते.

**//<><><><><>//**